# अजिंक्य न्यूज

शुक्रवार दि २९ ऑगस्ट २०२५


## डिजिटल सजगतेचा संकल्प – साताऱ्यात सायबर सुरक्षेवर प्रबोधनात्मक नाट्य



देशमुखनगर : क्विक हिल फाउंडेशन आणि कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, सातारा यांच्या संयुक्त विद्यमानाने रयत को-ऑपरेटिव्ह बँक, सातारा येथे इन्स्टिट्यूट मधील संगणक विभागातील सायबर वॉरियर्स विद्यार्थ्यांकडून सायबर सुरक्षेवरील विशेष प्रबोधनात्मक नाट्य सादर करण्यात आले.

या नाट्यप्रयोगातून सायबर गुन्हेगारी, सोशल मीडिया फसवणूक, सोशल इंजिनीयरिंग, आणि डिजिटल सुरक्षितता यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर प्रभावी प्रबोधन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी वास्तवातील उदाहरणांद्वारे सायबर सुरक्षेबाबत सजगतेचा संदेश दिला.

हे सादरीकरण रयत को-ऑपरेटिव्ह बँक, सातारा चे सभासद यांच्यासमोर करण्यात आले. उपस्थितांना सायबर धोके आणि त्यावरील सुरक्षिततेच्या उपाययोजना याबाबत माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी 'सायबर सेफ शपथ' घेतली. या शपथेद्वारे डिजिटल व्यवहार करताना सुरक्षिततेची काळजी घेणे, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करणे आणि सायबर गुन्ह्यांविषयी सजग राहणे याची प्रतिज्ञा करण्यात आली.

या उपक्रमामागे संस्थेचे संचालक डॉ. बी. एस. सावंत यांचे दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शन आणि सक्रीय सहकार्य लाभले. त्यांच्या पाठबळामुळे हा उपक्रम प्रभावीपणे पार पडला.

कार्यक्रमाचे नियोजन व समन्वयाची जबाबदारी कॉम्प्युटर विभाग प्रमुख डॉ. आर. डी. कुंभार आणि प्रा. पी. ए. लोखंडे यांनी समर्थपणे पार पाडली.

त्यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेची गरज, जबाबदारी आणि प्रत्यक्ष आयुष्यातील सुरक्षिततेचे उपाय याबाबत मार्गदर्शन करून उपक्रम अधिक परिणामकारक बनवला.

## स्वच्छतेबाबत वेळे गावाची आदर्श उपक्रमां पाहणी



वेळे – प्रतिनिधी : सातारा जिल्हा परिषद आणि केंद्रीय स्वच्छता समितीच्या तज्ञांनी अधिकारी यांनी वाई तालुक्यातील स्वच्छतेच्या तपासणीसाठी केली. महाराष्ट्र राज्यातील विविध उपक्रमांची पाहणी करताना विशेषत: घनकचरा व्यवस्थापन व्यवस्थित राबविले जात असल्याचे समाधान समितीने अंगणवाडी , डेमो घरकुलांना मिळणारा बायोगॅस ही पर्यावरण पूरक संकल्पना समितीने प्रत्यक्ष पाहिली.वेळे गावातील उपक्रमातील सहभागावर समाधान व्यक्त केले.

यावेळी महिला बचत गटांच्या कार्याला चालना देणाऱ्या 'ग्राम संघ' कार्यालयाचे उद्घाटन ए.एम. आय.एस. अकॅडमीचे अध्यक्ष कुणाल भावसार यांच्या हस्ते संपन्न झाले. या दरम्यान ग्रामपंचायत कार्यालयाच्या समोर वेळे गावातील नागरिकांनी स्वच्छतेची प्रतिज्ञा घेतली

या वेळी प्रमुख मान्यवरांमध्ये दिल्ली येथील ए.एम.आय.एस. अकॅडमीचे अध्यक्ष कुणाल भावसार, सातारा जिल्हा परिषदेचे स्वच्छता तज्ञ अजय राऊत, रविंद्र सोनवणे, रोहित जाधव यांच्यासह सरपंच अर्चना गायकवाड, उपसरपंच राहुल ननावरे, माजी उपसरपंच उषा पवार, ग्रामपंचायत सदस्य सिंधू ढमाळ, निलम नलावडे, दशरथ पवार, विजय पवार, दिपक पवार, ग्रामविकास अधिकारी श्रुतिका जाधव, महिला ग्रामसंघ अध्यक्षा सीमा जगताप, कोष्याध्यक्ष आशा पवार, कृषी सखी मनिषा पवार, सी.आर.पी. पूजा लांडगे तसेच महिला बचत गट सदस्य व ग्रामपंचायत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गावकऱ्यांच्या सहभागातून राबविलेल्या या स्वच्छता उपक्रमामुळे वाई तालुक्यातील ग्रामपंचायती राज्यात आदर्श ठरत असल्याचे मत समिती सदस्यांनी व्यक्त केले.


